REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख २९ सप्टेंबर, १९४८ अंक ३९

## सारस्वत

### को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[स्थापना १९१८] सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई



टे. नं. ३१६७५

| | |
|---|---|
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. ४,१३,४०० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स ... | रु. २,३५,६०० |
| ठेवी ... | रु. ८५,२७,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ९१,८०,००० |

बचतीच्या आकर्षक योजना

— विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा —

सब-ऑफिस : —दादर— ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन

एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

— शेड्यूल्ड बँक —

| | |
|---|---|
| वसूल झालेलें भांडवल | रु. १६,००,००० |
| रिझर्व व इतर फंड | रु. ४,?०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. २,००,००,००० |

संचालक मंडळ

श्री. धों. कृ. साठे ( चेअरमन )
श्री. वा. पुं. वर्दे ( व्हा. चेअरमन )

| | |
|---|---|
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. मा. रा. जोशी | श्री. फ. दां. पदमजी |
| श्री. मा. वि. शहा | श्री. शं. ल. किर्लोस्कर |
| श्री. भा. म. गुप्ते | श्री. मां. रा. ढमढेरे |

ट्रस्टी व एक्झीक्युटरचे कामाबाबत चौकशी करा.

मुख्य कचेरी : लक्ष्मी रोड, पुणें २ } चिं. त्रिं. जोग, मॅनेजर.

## दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

पुणें शाखा:-९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारींचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. —एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.— ब्रँच सेक्रेटरी

## नवीन पुष्कळ निघाले, तरी

## तुळजाराम मोदी,

## सातारा

ह्यांचें पुढारीपण कायम आहे.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

## मशिनरी खरेदीचा प्रश्न

कोणतीहि मशिनरी खरीदण्यापूर्वी आमचा सल्ला घ्या. आमचें सहकार्य आपल्या नेहमींच फायद्याचें ठरेल.

लेथस, ड्रिलिंग मशिन्स, ऑइल एंजिन्स, वगैरेचे विक्रेते.

केळकर बंधू, बुधवार चौक. पुणें २.


## विविध माहिती

**बँकांच्या गिऱ्हाइकांत मारामारी**—कलकत्ता येथील सुभाष रस्त्यावरील एका बँकेसमोर दोन बँकांच्या खातेदारांत मारामारी झाली. खातेदारांच्या एका गटानें दुसऱ्या एका बँकेच्या स्थैर्या-बद्दल साशंकता व्यक्त केली. त्यामुळें बँकेचे खातेदार चिडले व हातघाईवर आले.

**चित्रपटांच्या आयातीवर बंधनें**—फ्रान्समध्यें आयात होणाऱ्या अमेरिकन चित्रपटांवर फ्रेंच सरकारनें नवीं बंधनें घातलीं असून अमेरिकेनें तीं मान्य केलीं आहेत. उभयपक्षांत झालेल्या करारप्रमाणें, दर तीन महिन्यांत पांच आठवडे फ्रेंच फिल्म्सच फ्रान्समध्यें दाखविण्यांत येतील. परदेशी फिल्म्सपैकीं फ्रेंच संवाद ध्वनित करणाऱ्या १२१ अमेरिकन व ६५ इतर देशांतील फिल्म्स आयात करण्याचें फ्रेंच सरकारनें मान्य केलें आहे.

**हिन्दुस्थान मोटर्स लि. चा नफा**—३१ मार्च, १९४८ ह्या दिवशीं पुऱ्या झालेल्या वर्षांत हिन्दुस्थान मोटर्स लिमिटेड ह्या कंपनीला ३,०४,८५१ रुपये नफा झाला. गेल्या वर्षी कंपनीला ५४,३९३ रुपये नफा झाला होता. नफ्यांत झालेली ही वाढ विक्रींत झालेल्या वाढीमुळें झालेली आहे. सध्या कंपनीच्या कारखान्यांत ट्रक्स व टूरिंग गाड्या ह्या पूर्णपणें जुळविण्यांत येतात. त्याचप्रमाणें मुख्य भागांचें उत्पादन करण्याचीहि व्यवस्था हळु हळु केली जात आहे.

**रेल्वे एंजिनांचा स्वदेशी कारखाना**—असनसोल जवळ रेल्वे एंजिनांचा कारखाना उभारण्याचें काम चालू झालें आहे. १९५० सालअखेर कारखाना पूर्णपणें उभा राहील असा अंदाज आहे. १९५० अखेर पहिलें संपूर्ण हिंदी बनावटीचें रेल्वे एंजिन बाहेर पडेल. ह्या कारखान्यांत दरवर्षी १२० एंजिनें आणि ५० बॉयलर्स तयार होऊं शकतील. कारखाना चालविण्यासाठी २० कुशल यंत्रज्ञांना परदेशीं पाठवून, रेल्वे एंजिनांच्या कारखान्यांतून शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यांत येणार आहे.

**भागीदारांना पैसे परत देऊन भांडवल कमी करणार**—कित्येक कंपन्या बोनस शेअर्स देऊन आपलें भाग भांडवल वाढवीत असतांना ऑस्लर इलेक्ट्रिक लँप मॅन्युफॅक्चरिंग कं. लि., कलकत्ता, आपलें भांडवल २ कोटी रुपयांचें १½ कोटी रुपये करूं पहात आहे. कंपनीच्या प्रत्येक ऑर्डिनरी भागाची किंमत १० रु. आहे, ती ५ रु. करण्यांत येईल व हे ५ रु. भागीदारांना परत केले जातील. म्हणजे, ऑर्डिनरी भांडवल ७५ लक्ष रु. होईल. प्रेफरन्स भाग भांडवल ५० लक्ष रु. कायम ठेवण्यांत येईल.

**रेडिओवाल्यांना सूचना**—लोकांनीं आपले रेडिओ शेजाऱ्यांना उपसर्ग पोहोंचेल इतक्या मोठ्यानें लावूं नयेत, अशी सूचना बी. बी. सी. लंडन रेडिओवरून रेडिओवाल्यांना वरचेवर देण्यांत येते. स्वित्सरर्लंडमध्यें तर ह्याहि पुढें जाऊन, पोस्टांत कार्डा-पाकिटांवर छाप मारून रेडिओवाल्यांना त्यांची जबाबदारी दररोज पटवून देण्यांत येते. डेनमार्कमध्येंहि ह्याच पद्धतीनें रेडिओचा उपसर्ग कमी करण्याचा प्रयत्न करण्यांत येतो.

**चित्रपट निर्मात्यांना भांडवलाचा पुरवठा**—ग्रेट ब्रिटनमधील चित्रपट निर्मात्यांना भांडवल पुरविण्यासाठीं तेथील सरकार एक फिनॅन्स कॉर्पोरेशन स्थापन करीत आहे. ही कॉर्पोरेशन २५ लक्ष पौंड कर्ज उभारील, त्याच्या परतफेडीची हमी सरकार घेईल. हमीची रक्कम वाढवून पुढें ती ५० लक्ष पौंड करण्यांत येईल. ज्या निर्मात्यांना पैशाचें मोठें पाठबळ नाहीं, अशांना स्वतःच्या पायांवर उभें करण्याचा ह्या योजनेचा उद्देश आहे.

**दि आदर्श कृषि संस्था लि., धुळें**—धुळें येथील दि आदर्श कृषि संस्था लि. या संस्थेच्या देखरेखीखाली शेतीचें काम, ग्रामोद्योग, लहान प्रमाणावरील इतर उद्योगधंदे व घरगुती कामाकरतां वीज पुरवठा करण्याकरतां ग्रामीण विभागांत वीज उत्पादनकेंद्र साडेचारशे एकर जमिनीवर व्यापारी दृष्ट्या फळझाडांची लागवड, दुग्ध-वगैरे व्यवसाय अशी संयुक्त योजना अमलांत येत आहे. ग्रामीण विभागांतून अधिकाधिक विद्युत् पुरवठा होण्यानें देशाची प्रगति लवकर होईल व त्या दृष्टीनें ही कामाची प्रत्यक्ष सुरवात झाली ही बाब अभिनंदनीय आहे. श्री. द. वि. जावडेकर हे कंपनीचे संस्थापक व मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

**प्रकाशन संस्थेवर गंडांतर**—बर्नार्ड ग्रॅसेटची सुप्रसिद्ध फ्रेंच ग्रंथ प्रकाशन संस्था फ्रेंच कोर्टाच्या हुकुमानें बंद करण्यांत आली आहे. ह्या घटनेमुळें फ्रान्समधील साहित्यिकांत असंतोष पसरला आहे. गेल्या ३० वर्षांत ग्रॅसेटनें ७०० ग्रंथकारांचीं १,८०० पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत, त्यांचें पुढें काय होणार? ग्रंथकारांचे हक्क टेबल-खुर्च्यांप्रमाणें लिलावास निघणार काय? फ्रान्स जर्मनीच्या वर्चस्वाखाली आला असतांना, ग्रॅसेटनें जर्मनीस अनुकूल व फ्रान्सच्या पराभूत वृत्तीचीं कांहीं पुस्तकें प्रसिद्ध केलीं होतीं.

**न्यू फौंडलंड**—कॅनडाच्या पूर्वेस ॲटलांटिक महासागरांत न्यू फौंडलंड ही ४५० वर्षांची जुनी ब्रिटिश वसाहत आहे. तेथील लोकांच्या सार्वमतानुसार ती आतां कॅनडास जोडली जाणार आहे. कॅनडाची व ग्रेटब्रिटनची त्यास संमति आहे.

**देशद्रोह्यास फाशी**—ज्यूंना म्हणजे शत्रूला शस्त्रें पुरविण्याचा आरोप एका इराकी धनाढ्य व्यापाऱ्यावर सिद्ध होऊन त्यास फाशीची शिक्षा मिळाली आणि ती बसरा येथें सार्वजनिक चौकांत अंमलांत आणण्यांत आली.

**रेशनिंग पुनः येणार**—दर माणसास १२ औंस ह्याप्रमाणें ७ कोटी हिंदी नागरिकांना अन्न पुरविण्याची जबाबदारी हिंदुस्थान सरकार घेणार आहे. सध्या ३ कोटी लोक रेशनवर आहेत. सध्याच्या बिकट आर्थिक परिस्थितीवरील उपाययोजनेचाच हा एक भाग आहे. धान्याचा मध्यवर्ती सांठा निर्माण करण्याचा सरकार प्रयत्न करील.


-सर्व प्रांतांतील- सुती-गरम-रेशमी -खादीचें माहेरघर-

# खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ ढमढेरे बोळाजवळ पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. १९ सप्टेंबर १९४८



संस्थापक

प्रो. वा. गो. काळे

संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## बँकिंग कंपनीज (कंट्रोल) ऑर्डिनन्स १९४८

### ठेवीदारांच्या हितासाठी उपाययोजना

#### रिझर्व बँकेस व्यापक अधिकार: बँकांवर कडक निर्बंध

बँकिंग कंपन्यांचें नियंत्रण हिंदी आर्थिक परिस्थिती भक्कम पायावर आणण्याच्या दृष्टीनें अत्यंत तातडीनें आवश्यक झालें असल्याकारणानें, गव्हर्नर जनरलनी आपल्या अधिकारांत, बँकिंग बिलाचें कायद्यांत रूपांतर होण्याची वाट न पहातां, वरील ऑर्डिनन्स गेल्या आठवड्यांत काढला व तेव्हांपासून तो अंमलांतहि आला. हिंदी संघराज्याच्या सर्व घटक संस्थानांनाहि तो लागू आहे. सहकारी बँकांना अर्थातच तो लागू नाहीं. बँकिंग कंपन्यांना इतर जे कायदे आज लागू आहेत, त्यांत आतां ह्या ऑर्डिनन्सची भर पडत आहे. ऑर्डिनन्सनें बँकिंग कंपनीची व्याख्या बिलांतील व्याख्येपेक्षा विस्तृत केली आहे. " बँकिंग कंपनी म्हणजे कंपनी कायद्याच्या २७७ एफ कलमानें सांगितलेली बँकिंग कंपनी; ह्या व्याख्येंत आतां इंपीरिअल बँकेचा मुद्दाम निर्देश करून समावेश करण्यांत आला आहे. हिंदुस्थानच्या कोणत्याहि प्रांताच्या बाहेर स्थापन झालेली परंतु हिंदुस्थानांत बँकिंग कंपनीचें काम करणारी बँकिंग कंपनीहि ऑर्डिनन्सचे कक्षेंत आणण्यांत आली आहे. " तारणावरील कर्जाची व्याख्या बिलांतील व्याख्येप्रमाणेंच, खालील प्रमाणें आहे. " तारणाची बाजारी किंमत कर्जाच्या रकमेपेक्षा केव्हांहि कमी नसेल, तरच असें कर्ज तारणावरील ( सिक्युअर्ड ) समजलें जाईल. " बाकीचें कर्ज विना-तारण ( अन-सिक्युअर्ड ) होय.

सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें रिझर्व्ह बँकेस आवश्यक वाटल्यास, ती बँकिंग कंपन्यांनीं कोणत्या धोरणानें कर्जें द्यावींत, तें धोरण त्यांना आंखून देईल. बँकिंग कंपन्यांनीं त्या धोरणानेंच वागलें पाहिजे. कोणत्या कारणांसाठी कर्जें द्यावीं अगर देऊं नयेत, तारणावरील कर्जांचे बाबतींत मार्जिन किती राखावा, व्याज किती आकारावें, इत्यादि बाबतींतहि रिझर्व्ह बँक त्यांना सूचना करूं शकेल आणि त्या सूचना बँकिंग कंपन्यांनीं पाळल्याच पाहिजेत. कोणतीहि बँकिंग कंपनी स्वतःच्या शेअर्सच्या तारणावर कर्ज देऊं शकणार नाहीं. त्याचप्रमाणें, स्वतःच्या डायरेक्टरास किंवा ज्या फर्ममध्यें अथवा खाजगी कंपनींत बँकिंग कंपनीचा किंवा तिच्या डायरेक्टरांचा हितसंबंध आहे अशा फर्मला किंवा खासगी कंपनीला बँकिंग कंपनीस विना-तारण कर्ज देतां येणार नाहीं. व्यक्तींना, फर्म्सना किंवा खासगी कंपन्यांना बँकिंग कंपनीचा डायरेक्टर गॅरंटॉर असेल, तर त्यांसहि कर्ज मिळणार नाहीं. बँकिंग बिलांत डायरेक्टरांची गॅरंटॉरची भूमिका लक्षांत घेतलेली नव्हती ती आतां ऑर्डिनन्सचे कक्षेंत आली आहे. खासगी कंपन्या वगळून बाकीच्या सर्व कंपन्यांना (ज्यांत बँकिंग कंपनीचा किंवा तिच्या कोणत्याहि डायरेक्टराचा डायरेक्टर, मॅनेजिंग एजंट अथवा गॅरंटॉर ह्या नात्याचा संबंध असेल ) दिलेल्या विना-तारण कर्जांचा तपशील ठराविक तक्त्यांत व ठराविक पद्धतीनें प्रत्येक बँकिंग कंपनीनें रिझर्व्ह बँकेकडे धाडला पाहिजे. ह्या तक्त्याचा नमुना अर्थातच रिझर्व्ह बँक पुरवील. सप्टेंबरमध्यें दिलेल्या कर्जांचा तपशील ऑक्टोबर संपण्यापूर्वी पाठविला पाहिजे, ह्याप्रमाणें दर महिन्यास तक्ते जातील. त्या तक्त्यांतील कोठलींहि कर्जें बँकिंग कंपनीच्या ठेवीदारांच्या हितास बाधक आहेत असें हे तक्ते पाहून रिझर्व्ह बँकेस वाटलें, तर ती इलाज करूं शकेल. अशीं कर्जें बँकिंग कंपनीनें पुनः देण्यास प्रतिबंध करणें, कर्जें देण्यावर कांहीं निर्बंध घालणें आणि अगोदर दिलेलीं कर्जें रिझर्व्ह बँक सांगेल त्या मुदतींत तिला वसूल करावयास लावणें, हे अधिकार रिझर्व्ह बँकेस ऑर्डिनन्सनें दिले आहेत.

३१ मार्च, ३० जून, ३० सप्टेंबर व ३१ डिसेंबर ह्यापैकीं कोणत्याहि दिवशीं बँकिंग कंपनीची हिंदुस्थानांतील जिंदगी तिच्या 'डिमांड' व 'टाइम' देण्यांच्या ७५% पेक्षा कमी असतां कामा नये. प्रत्येक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी संपण्यापूर्वी त्या पूर्वीच्या तिमाही अखेरच्या माहितीचे तक्ते रिझर्व्ह बँकेकडे पाठविले पाहिजेत. मागणी येताच जें देणें दिलें पाहिजे, तें 'डिमांड' देणें व उरलेलें सर्व देणें 'टाइम' देणें होय. जिंदगीमध्यें खालील गोष्टींचाहि समावेश होतो: ( अ ) ज्या प्रॉमिसरी नोटा, बिल्स ऑफ एक्सचेंज व सिक्युरिटीज खरेदी करण्याचा, डिस्कौंट करण्याचा किंवा ज्यांचे तारणावर कर्जें देण्याचा रिझर्व्ह बँकेस अधिकार आहे, व ( ब ) हिंदुस्थानांत काढलेलीं व ज्या चलनांत तीं पटविलीं जावयाचीं त्यांस रिझर्व्ह बँकेची मान्यता असलेलीं एक्सपोर्ट बिलें. प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या शुक्रवारीं आणि त्या दिवशीं सुट्टी असल्यास आधीच्या कामाचे दिवशीं बँकिंग कंपनीची हिंदुस्थानांत किती जिंदगी व देणें आहे, त्याचा ठराविक तक्ता ठराविक पद्धतीनें रिझर्व्ह बँकेकडे पाठविला पाहिजे. ऑक्टोबरच्या शेवटच्या शुक्रवार रोजींचा तक्ता नोव्हेंबर संपण्यापूर्वी धाडला पाहिजे. ह्या प्रमाणें दर महिन्यास व्यवस्था केली पाहिजे. रिझर्व्ह बँकेनें तशी मागणी केली, तर प्रत्येक सहामाहीस प्रत्येक बँकिंग कंपनीनें तिनें दिलेल्या कर्जांची व तिनें गुंतविलेल्या रकमांची कारखानदारी, व्यापार व शेती ह्या दृष्टीनें पृथःकरण करून माहिती पुरविली पाहिजे.

ऑर्डिनन्सनें रिझर्व्ह बँकेला आणखीहि कांहीं व्यापक अधिकार दिले आहेत. कोणताहि विशिष्ट किंवा विशिष्ट प्रकारचा व्यवहार न करण्यास कोणत्याहि बँकिंग कंपनीला ती सांगूं शकेल. बँकेच्या व्यवहारासंबंधांतील एखाद्या बाबतींत विशिष्ट गोष्ट करा अथवा करूं नका, असाहि हुकूम तिचेवर रिझर्व्ह बँक बजावूं शकेल. बँकिंग, कंपन्यांच्या एकत्रीकरणाचे संबंधांत, त्यांनीं तशी विनंति केल्यास, रिझर्व्ह बँक मध्यस्त म्हणून किंवा इतर प्रकारांनीं मदत करील. १९४६ च्या बँकिंग कंपनीज ( इन्स्पेक्शन ) ऑर्डिनन्सनें रिझर्व्ह बँकेला बँकिंग कंपन्या तपासण्याचे अधिकार दिलेले आहेत. त्यांस अनुसरून तपासणी केल्यावर, रिझर्व्ह बँक बँकिंग कंपनीस डायरेक्टर बोर्डाची सभा बोलविण्यास सांगूं शकेल. तपासणींतून निष्पन्न झालेल्या बाबींचा विचार करणें किंवा त्या बाबींची रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्याशीं चर्चा करणें, हा अशा

सभेचा उद्देश राहील. तपासणींत आढळून आलेल्या प्रकारांमुळें जरूर वाटतील ते बँकिंग कंपनीच्या व्यवस्थेंत बदल घडवून आणण्याचाहि रिझर्व्ह बँकेस अधिकार देण्यांत आला आहे.

कोणत्याहि बँकिंग कंपनीच्या व्यवहाराविषयीं कोणतीहि माहिती केव्हांहि मागविण्याचा अधिकार रिझर्व्ह बँकेस देण्यांत आला आहे. रिझर्व्ह बँकेनें बँकिंग कंपनीच्या व्यवस्थेंत बदल घडवून आणण्यास तिला भाग पाडल्यामुळें व्यवस्थापकाचें कांहींहि ( करार बुडाल्यामुळें किंवा अन्य प्रकारें ) नुकसान झालें तरी त्यास त्याची भरपाई मिळण्याचा अधिकार नाहीं. प्रस्तुत ऑर्डिनन्सखालीं रिझर्व्ह बँकेस पुरविण्याच्या तक्त्यांत अथवा माहितींत कोणीहि बुद्धि-पुरस्सर कोणत्याहि दृष्टीनें महत्त्वाचें चुकीचें विधान केलें किंवा बुद्धि-पुरस्सर महत्त्वाचें विधान करण्याचें टाळलें, तर तो तीन वर्षें तुरुंग-वासास आणि दंडास पात्र होईल. ऑर्डिनन्सनें आवश्यक केलेल्या गोष्टी बँकेनें केल्या नाहींत आणि त्यांत बँकेच्या डायरेक्टराचा किंवा अधिकाऱ्याचा जाणीवपूर्वक हात असेल तर त्यास ५०० रुपयांपर्यंत दंड होईल आणि ही चूक चालू राहिली तर चूक चालू राहीपर्यंत दररोज ५० रुपयांपर्यंत दंड होईल. बँकिंग कंपनीनें ऑर्डिनन्सचा कोठल्याहि प्रकारें भंग केला तर रिझर्व्ह बँक वरील तरतुदींस बाध न येतां तिला नोटीस देऊन दुरुस्तीसाठी ३० दिवसांची मुदत देईल. ह्या मुदतींत दुरुस्ती झाली नाहीं, तर बँकिंग कंपनी गुंडाळण्यांत यावी असा कोर्टाकडे अर्ज रिझर्व्ह बँक करूं शकेल. असा अर्ज कोर्टाकडे आला, तर कोर्टानें तो मंजूर करावयाचा आहे.

ऑर्डिनन्सचे उद्देश अमलांत आणण्यासाठीं मध्यवर्ती सरकारास जरूर ते नियम करण्याचा अधिकार ऑर्डिनन्सनें दिला आहे.

## स्फुट विचार

### कामगारांना नफ्यांत भागीदारी देण्याचा प्रयोग

वरील विषयाचा विचार करण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें नेमलेल्या कमिटीनें आपला रिपोर्ट सादर केला आहे. कपास कापड, ताग, पोलाद, सिमेंट, टायर्स व सिगारेटस् ह्यांच्या उत्पादनाच्या धंद्यांत कामगारांना नफ्यामध्यें भागीदारी देण्याचा प्रयोग करण्यांत यावा असें कमिटीनें सुचविलें आहे. उत्पादन वाढीस प्रोत्साहन, औद्योगिक शांतता राहण्याचें साधन व व्यवस्थेमध्यें कामगारांना स्थान मिळण्याची पहिली पायरी ह्या तीन उद्दिष्टांच्या सिद्धिसाठी ही भागीदारी देण्यांत येईल. धंद्यांच्या वाढाव्याच्या नफ्याचा निम्मा नफा कामगारांच्या वांटणीस येईल. ह्या वांटणींतील प्रत्येक कामगाराचा हिस्सा त्याच्या पूर्वीच्या बारा महिन्यांतील प्राप्तीवर अवलंबून राहील. मुंबई, अहमदाबाद व सोलापूर येथील गिरण्यांचा नफा एकत्रित करून प्रत्येक केंद्राच्या ठिकाणच्या कामगारांचा हिस्सा ठरविण्यांत येईल. त्यामुळें तेथील एखाद्या गिरणीस नफा झाला नाहीं, तरी तिच्या कामगारांना नफावांटणी मिळेल. ठोक नफ्यांतून प्रथम घसारा काढण्यांत येईल, आणि ठोक नफ्यांतून घसारा, मॅनेजिंग एजन्सी कमिशन व कर ह्यांची तरतूद केल्यावर रिझर्व्ह काढण्यांत येतील. वसूल भांडवल व धंद्या-साठीं काढलेले रिझर्व्ह ह्यांवर ६% नफा सुटल्यावर जी रकम उरेल, तिच्या निम्मी रकम कामगारांच्या वांट्यास येईल आणि बाकीची निम्मी रकम शेअर होल्डर्सना आणखी डिव्हिडंड देण्यास उपलब्ध होईल. त्यामुळें प्रारंभीं सांगितलेले सहाहि धंदे पुरेसें डिव्हिडंड वांटूं शकतील, अशी कमिटीची अपेक्षा आहे. टाटा आर्यन अँड स्टील कं. चा १९४७-४८ चा हिशेब पाहिला, तर तिच्या कामगारांना नफ्यांतील भागीदारीच्या हिशेबानें २८ लक्ष, १० हजार रु. मिळण्याचा हक्क आहे. परंतु, कंपनीनें आपण होऊन ५५ लक्ष रु. दिलेले आहेत. असोसिएटेड सिमेंट कंपनीच्या कामगारांच्या वांट्यास तर कांहींच नफा आला नसता; परंतु कंपनीनें त्यांना आपण होऊन ८½ लक्ष रु. दिलेले आहेत. ह्या-वरून, कामगारांना प्रस्तुत योजनेपासून विशेष फायदा होईलच व औद्योगिक शांतता नांदेल, असें निश्चयानें सांगता येत नाहीं. पैसे गुंतविणारांना योजना साधारणपणें पसंत पडली आहे.

---

### खर्चाच्या नव्या जबाबदाऱ्या न घेण्याचें सरकारी धोरण ?

घोड्यांच्या शर्यतीवरील करापासून मुंबई सरकारास १९४७-४८ मध्यें १,००,८०,००० रु. उत्पन्न मिळालें. १९५२ नंतर ह्या शर्यती बंद करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. त्यामुळें सरकार दरसाल १ कोटी रुपयांच्या उत्पन्नास मुकेल. प्रांतिक सरकारांनीं आपल्या दारूबंदीच्या योजनांची अंमलबजावणी जरा मंद गतीनें करावी, अशी सूचना त्यांना हिंदुस्थान सरकारनें केली आहे. त्याचप्रमाणें जमिनदारी नष्ट करण्याच्या योजना बिहार व मद्रास ह्या प्रांतांनीं तयार केल्या आहेत, त्याहि स्थगित कराव्या असें हिंदुस्थान सरकारचें म्हणणें आहे. दारूबंदीमुळें खजिन्यांत पड-णारी तूट भरून काढण्यासाठीं किंवा जमीनदारांची नुकसान-भरपाई करण्यासाठीं प्रांतिक सरकारांनीं कर्ज उभारणीचा अवलंब करूं नये, असा हिंदुस्थान सरकारचा आदेश आहे. ह्या बाबतींत मध्यवर्ती सरकार त्यांना कोणतीहि आर्थिक मदत करणार नाहीं. चलनवाढ सत्वर आटोक्यांत आली नाहीं तर मुंबई प्रांतांतील कर वाढवावे लागतील, असें प्रांतिक अर्थमंत्र्यांनीं विधिमंडळांत जाहीर केलें आहेच. देशांतील बिकट आर्थिक परिस्थितीस तोंड देण्यासाठी जो कार्यक्रम आखावयाचा, त्यांत पुढें ढकलतां येण्याजोगे खर्च लांब-णीवर टाकावयाच्या व उत्पन्नाचे उपलब्ध मार्ग नष्ट न करण्याच्या धोरणास महत्त्वाचें स्थान आहे. हें धोरण अंगीकारूनहि मध्यवर्ती व प्रांतिक करवाढ अपरिहार्य व अपेक्षितच आहे. दारू-बंदी व जमीनविषयक सुधारणा ह्या बाबतीमधील मुंबई सरकारच्या योजना विचारपूर्वक आंखण्यांत आल्या आहेत आणि त्या पार पाडण्यासाठीं मध्यवर्ती सरकारकडून आर्थिक मदत मिळण्याची आवश्यकता नाहीं व कर्जहि उभारावें लागणार नाहीं, असा खुलासा मुंबईचे पंतप्रधान श्री. खेर ह्यांनीं केला आहे, तो ह्या प्रांताच्या नागरिकांना समाधानकारक वाटेल.

---

**कापड गिरण्यांची यंत्रसामुग्री**—जपानच्या, १९४८ साला-मधील कापडाच्या गिरण्यांच्या यंत्रांच्या निर्यातींत १ लाख, ४५ हजार चात्या व १० हजार माग आहेत. ह्या मागांत कापसाच्या कापडाचे व रेशमाच्या कापडाचे असे दोन्ही तऱ्हेचे माग आहेत. ह्यापैकीं बहुतेक यंत्रसामुग्री हिंदुस्थानांत येणार आहे, असें म्हण-तात.

**मद्रास प्रांतांत लोखंड**—मद्रास प्रांतांतील सांडूर, सालेम, त्रिचनापल्ली व कुर्नोल ह्या जिल्ह्यांत लोखंड सांपडण्याची शक्यता आहे, असें मध्यवर्ती सरकारच्या भूगर्भ खात्यानें केलेल्या संशोध-नांत आढळून आलें. सालेम जिल्ह्यांत जवळ जवळ ३० कोटी टन, कुर्नोलमध्यें ३० लाख टन आणि सांडूर जिल्ह्यांत १३ कोटी टन लोखंडाची माती निघूं शकेल असा अंदाज आहे. ह्या मातीचा उपयोग करण्यासाठीं हिंद सरकारनें दक्षिण हिंदुस्थानांत एक पोला-दाचा कारखाना काढावा, अशी विनंति मद्रास सरकारनें केली आहे.

## शेती पतीची पुनर्घटना

श्री. संपादक, "अर्थ," यांसी—

कृ. सा. न. वि. वि.

आपल्या, दिनांक २८ ऑगस्टचे अंकांत प्रसिद्ध झालेल्या वरील विषयावरील माझ्या लेखाबाबत पुणें येथील सुप्रसिद्ध प्राध्यापक रा. वि. ओतूरकर यांनीं आपल्या दिनांक १५ सप्टेंबरचे अंकांत पत्र लिहून कांहीं मुद्द्यांसंबंधीं स्पष्टीकरण मागितलें आहे.

माझ्या लेखाचा मुख्य उद्देश असा, कीं या विषयासंबंधीची माहिती, वादग्रस्त प्रश्न शक्य तितके न आणतां अगर व्यक्तिविषयक टीका न करतां, लोकांपुढें मांडली जावी. प्रा. ओतूरकर यांच्या पत्रांत मुख्यतः खालील मुद्दे आहेत.

( १ ) माझें निश्चित मत गाडगीळ समितीप्रमाणें आहे. ( २ ) नवीन पुनर्घटनेस यश चिंतण्याचें कारण? ( ३ ) सहकारी संघटनेला हें काम झेपणार नाहीं. ( ४ ) स्वतंत्र मध्यवर्ती प्रांतिक संघटना निर्माण करावी व सरकारनेंच तें काम करावें.

पहिल्या मुद्यासंबंधीं श्री. ओतूरकर यांनींच असें उत्तर दिलें आहे कीं, माझें मत गाडगीळ समितीच्या शिफारसीप्रमाणें सरकारनें क्रेडिट कार्पोरेशन्स स्थापून त्यामार्गानें पैसा पुरवावा असें आहे. मी यश चिंतितों तें एवढ्यासाठीं कीं सहकारी कार्यकर्त्यांनीं चर्चा, विचारविनिमय करून सर्व विचारांतीं निर्णय घेतला व त्यासंबंधीं जरी कांहीं आतां मतभेद असले तरी सहकारी चळवळींतील एक कार्य करणारा ह्या दृष्टीनें सहकारी तत्त्वाप्रमाणें मला त्या बाबत शक्य तें सहाय्य करणें हें क्रमप्राप्तच आहे. म्हणूनच यश चिंतणें माझें कर्तव्य आहे. सहकारी कार्यकर्त्यांनीं घेतलेला निर्णय आतां तरी बदलणें शक्य नाहीं. कारण, सरकारनें त्यांच्या शिफारशीप्रमाणें समिती नेमली. त्या समितीच्या अहवालास मान्यता देऊन सरकारनें तपशीलवार योजना तयार करण्यास सुरवात केली. येवढी प्रगति झाली असल्यानें, आतां येणाऱ्या योजनेचें स्वागत करून तिचा जास्तींत जास्त उपयोग करणेंच योग्य ठरेल. नवीन पुनर्घटित सहकारी चळवळ ही जवळ जवळ गाडगीळ समितीच्या शिफारशीप्रमाणें क्रेडिट कॉर्पोरेशनच्या धर्तीवरच, अल्प प्रमाणांत होईल, असेंच म्हणावें लागेल. याचा स्पष्ट अर्थ असाच कीं, धड ना सरकारी क्रेडिट कॉर्पोरेशन ना संपूर्ण सहकारी चळवळ, अशी परिस्थिति होणार! सहकारी चळवळी मार्फत काम व्हावयाचें असल्यास त्यास प्रथमतः प्राथमिक सहकारी संस्थांसाठी लागणारा कार्यक्षम असा नोकरवर्ग, देखरेखीची समाधानकारक व्यवस्था व वसुलीबाबत सरकारची निश्चित व कार्यक्षम अशी मदत असणें जरूर आहे. प्रा. ओतूरकर यांनीं आपल्या पत्रांतच 'भाव नियंत्रण करून शेतीच्या व्यवहारांत स्थैर्य आणण्याबाबत' खुलासा केला आहे. सहकारी चळवळीस हें काम घ्यावयाचें असेल तर ह्या बाबतींत निश्चित योजना व्हावयास पाहिजे असेंच माझेंहि मत आहे. आजची परिस्थिति व या प्रश्नासंबंधीची प्रगति अशी आहे कीं, आतां हें काम कोणी करावें हा प्रश्न विचाराबाहेरचा असून त्याबाबत विधायक सूचना करणें फक्त शक्य आहे.

पुणें २ य. द. खोर्ले.

---

**वादळानें तांदुळाचा नाश**—जपानमध्यें नुकतेंच जें वादळ झालें, त्यांत २५ लाख बुशेल तांदुळाचा नाश झाला. तरीसुद्धा जपानमध्यें ह्या हंगामांत ३० कोटी बुशेल तांदूळ उत्पन्न होईल, असा अंदाज आहे.

## मुंबई प्रांतासाठी सहकारी ट्रायब्यूनलची स्थापना

### सभासदांत रजिस्ट्रारचा समावेश

मुंबई प्रांतांत सहकारी रजिस्ट्रारचे अपेलेट व रिव्हिजनचे अधिकार एका "कोऑपरेटिव्ह ट्रायब्यूनल" कडे सोपविण्यांत यावयाचे आहेत. त्या संबंधांतील नियमांचा मसुदा प्रसिद्ध झाला आहे. त्यांत ट्रायब्यूनलची घटना खालीलप्रमाणें दिली आहे. ट्रायब्यूनलचे तीन सभासद असतील, त्यांपैकी अध्यक्ष हे हायकोर्ट जज्जाचें काम केलेले, सेवानिवृत्त डिस्ट्रिक्ट जज्ज किंवा माजी सहकारी रजिस्ट्रार असले पाहिजेत. उरलेल्या दोन सभासदांपैकी एक बिन-सरकारी (सहकारी चळवळीशीं परिचय असलेला वकील) असेल आणि दुसरा विद्यमान रजिस्ट्रार हा असेल. रजिस्ट्रारच्याच निकालाविरुद्ध किंवा हुकुमाविरुद्ध ट्रायब्यूनलकडे अपील आलें तर रजिस्ट्रारच्या ऐवजी रेव्हेन्यू खात्याचा सेक्रेटरी ट्रायब्यूनलचा सभासद म्हणून तेवढ्यापुरतें काम करील.

ट्रायब्यूनलची कल्पना सहकारी कार्यकर्त्यांना विशेष स्वागतार्ह वाटली, त्याचें कारण त्याचें अपेक्षित बिन-सरकारी स्वरूप हें होय. ट्रायब्यूनलच्या सभासदांपैकी बहुसंख्य बिन-सरकारी असणें जरूर आहे, असें मत प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटनें दिलें होतें. परंतु नियमांत मात्र ह्या मूळ कल्पनेस थोडी कलाटणी मिळालेली दिसते.

---

### ग्राम सुधार सप्ताह

मुंबई प्रांताचे पंतप्रधान श्री. खेर, ह्यांनीं ता. २ ऑक्टोबर ते १२ ऑक्टोबर हा आठवडा 'ग्राम सुधार सप्ताह' म्हणून पाळावा अशी इच्छा प्रदर्शित केली आहे. ता. २ ऑक्टोबर हा महात्माजींचा जन्मदिन आहे. ह्या सप्ताहासंबंधीं पंत प्रधानांनीं एक पत्रक काढलें असून त्यांत गांधीजींचें योग्य स्मारक म्हणजे खेडीं सुधारण्याचा त्यांचा कार्यक्रम अंमलांत आणणें होय, असें म्हटलें आहे. सप्ताहांत मुख्यतः पुढील कार्यक्रमाचा अंतर्भाव करण्यांत आलेला आहे. गांव स्वच्छ करणें, शक्य असेल तेथें गांवाच्या मांडणींत सुधारणा करणें, गांवाची साफसफाई करतांना जी घाण काढण्यांत येईल तिचा खत तयार करण्यासाठीं उपयोग करणें, गांवांत खतासाठीं खड्डे खणणें, गांवांतील गटांत व व्यक्तींत परस्परांत आपलेपणाची भावना निर्माण करण्याचे प्रयत्न करणें, अस्पृश्यांची कुचंबणा होत असेल तर ती थांबविणें, अनिष्ट सामाजिक चालीरीती बंद करणें, पाण्यासाठीं विहिरी खाणण्याच्या योजना निश्चित करणें, जुन्या विहिरींची दुरुस्ती करणें, जमिनीचा कस राखण्याच्या दृष्टीनें योजना आखणें, चराईचीं रानें सुधारणें व त्यांचा योग्य वापर करणें, धान्याच्या बँकांची आणि मल्टिपरपज सहकारी संस्थांची संघटना करणें, प्राथमिक शाळा सुरू करण्याची शक्यता अजमावणें, वाचनालयासाठीं वर्गणी गोळा करणें, खेड्यांत दारूबंदीची योजना यशस्वी करण्यासाठीं उपाययोजनेचा विचार करणें, पिण्याचें पाणी मिळण्याची अधिक चांगली व्यवस्था करणें, रस्ते सुधारणें अगर गांवांत येण्यासाठीं नवीन रस्ते करणें, अन्नधान्याच्या बाबतींत खेडें स्वयंपूर्ण होण्यासाठीं योजना आखणें, खेड्याचें रक्षण करण्यासाठीं होम गार्ड्स अगर संरक्षण संघ निर्माण करणें. महात्मा गांधीजींनीं खेड्यांची सुधारणा करणें हें आपल्या जीवित कार्यापैकींच एक मानलें होतें हें प्रसिद्धच आहे. तेव्हां श्री. खेर ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें ग्राम सुधारणा हें त्यांचें उत्कृष्ट स्मारक होईल यांत शंका नाहीं.

## सहकारी बँकांचे अहवाल

### दि कल्याण पीपल्स को. बँक लि.

वरील बँकेचें कार्यक्षेत्र कल्याण, मुरबाड व शाहापूर अशा तीन तालुक्यांत आहे. मालाच्या तारणांतील व्यवहारांत बँकेनें बरीच प्रगति केली आहे. तिनें भात, कोळसा, लांकूड, सोनें, चांदी, वगैरे मालावर माफक व्याजानें कर्जें देण्यास प्रारंभ केल्यापासून तिचा पुष्कळ लोकांनीं फायदा घेतला आहे. बँकेचें वसूल भांडवल १ लक्ष रु. असून रिझर्व्ह व इतर फंड ४०,३५५ रु. चे आहेत. त्यांत आतां सुमारें २५ हजारांची भर पडत आहे. अहवालाचे वर्षी बँकेस ३१,२०१ रु. नफा झाला, त्याचें प्रमुख कारण बँकेचा अत्यंत काटकसरीचा कारभार हें होय. (चेअरमनः श्री. दौ. ज. झुंजारराव; मॅ. डायरेक्टरः श्री. गं. रा. भिडे; मॅनेजरः श्री. बा. बा. रुद्रभटे)

### दि बेळगांव पायोनियर अर्बन को. क्रे. बँक लि.

२ लक्ष, ८७ हजार रु. वसूल भांडवल; १ लक्ष, ९९ हजार रु. रिझर्व्ह फंड; १ लक्ष, २८ हजार रु. इतर फंड; असें ६ लक्ष, १५ हजार रुपयांचें बँकेचें स्वतःचें भांडवल आहे आणि त्याचें १७ लक्ष, ६९ हजार रु. ठेवींशीं अत्यंत अनुकूल असें प्रमाण पडत आहे. बँकेनें ९ लक्ष, ५९ हजार रुपये व्यक्तिशः कर्जाऊ दिले आहेत. अहवालाचे वर्षी शेअर भांडवल व ठेवी ह्यांत वाढ झाली आहे आणि कंट्रोल उठल्यामुळें शेवटच्या ५–६ महिन्यांत गोडाऊन व्यवहाराचा विशेष फायदा झाला. १९४७-४८ ची नफ्याची रक्कम (२९,७५१ रु.) गेल्या पांच सालांपेक्षा अधिक आहे. बँकेच्या कार्यक्षेत्रांत नवीन सहकारी संस्था अस्तित्वांत येत आहेत. बँकेची कार्यक्षमता, भांडवल व ठेवी ह्यांकडे लक्ष देतां सहकारी खातें ह्या बँकेस फायनॅन्सिंग एजंट म्हणून नेमील अशी अपेक्षा आहे. नफ्यापैकी १७,२४१ रु. ६% डिव्हिडंडला लागले. म. गांधी स्मारक निधीस १,००१ रु. देण्यांत आले. (चेअरमनः श्री. बी. बी. पोतदार, बी. ए., एलएल. बी., वकील; मॅनेजरः श्री. पी. जी. कामत, बी. कॉम.)

### दि तासगांव अर्बन को. बँक लि.

वरील बँकेकडे ठेवी वाढत जाऊन, नव्या ठेवी बंद करण्याची तिचेवर पाळी आली आहे. तिचें खेळतें भांडवल २ लक्ष, ६६ हजार रुपयांवरून ३ लक्ष, १९ हजार रुपयांवर गेलें आहे. नियंत्रण काळांत सारव्याचा होलसेल व्यवहार बँकेच्या नोकरांनीं विनामूल्य करून बँकेस २०० रु. मिळवून दिले. "बँकेनें आपल्या चोखट्या व्यवहारानें सर्व लोकांचा विश्वास संपादन केला आहे व स्थानिक व्यापार आणि उद्योगधंदे यांना मदत करण्याचें धोरण ठरवलेलें आहे." बँकेचें व्यवहारक्षेत्र सर्व तालुकाभर वाढविण्यांत येणार आहे. रा. ब. स. बा. शेटे, जमिनदार, हे बँकेच्या स्थापनेपासून १३ वर्षे चेअरमन आहेत. अहवालाचे वर्षी बँकेस ३,३१० रु. नफा झाला. ५% डिव्हिडंडला १,१८० रु. लागले व म. गांधी फंडास २९० रु. देण्यांत आले. (चेअरमनः रा. ब. शेटे; मॅनेजरः श्री. जी. के. कुलकर्णी.)

### श्रीमहावीर को. बँक लि., कोल्हापूर

व्यापारधंद्याची परिस्थिति अत्यंत नाजूक झालेली असतांनासुद्धा, वरील बँकेनें आपली प्रगति कायम राखली आहे. बँकेच्या ५ लक्ष, ५ हजार रु. च्या खेळत्या भांडवलापैकी सुमारें ९४ हजारांचें भांडवल तिच्या स्वतःच्या मालकीचें आहे आणि त्यांत ४२,३५३ रु. चे रिझर्व्हज् आहेत. त्यांत आतां ५½ हजारांची भर पडत आहे. बँकेनें १९३९-४० पासून सतत ७½% डिव्हिडंड वाटलें आहे. अहवालाचे वर्षी बँकेस ९,९१८ रु. नफा झाला आहे. जमेच्या बाजूस डिस्कौंट, कमिशन, वगैरे पोटीं १९,१७५ रु. आहेत. त्यावरून बँकेच्या किफायतशीर सेवेची कल्पना येईल. जयसिंगपूर शाखेचें कामहि समाधानकारक झालें आहे. (चेअरमनः श्री. गं. सि. चौगुले, एम. एल. ए.; मॅनेजिंग डायरेक्टर: श्री. बंडोपंत भा. सुलताने.)

### दि कॉसमॉस को. अर्बन बँक लि., पुणें

वरील बँकेच्या १२½ लक्ष रु. खेळत्या भांडवलापैकी ९¾ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत आणि बँकेनें आपल्या जिंदगीपैकी ८¼ लक्ष रु. सरकारी कर्जरोख्यांत व शेअर्समध्यें गुंतविलेले आहेत. बँकेचें भाग भांडवल ९५,६०० रु. असून गंगाजळी ५४,८१६ रु. ची आहे. प्राप्तीवरील कर (१२,४२३ रु.) परत मिळाल्यानें अहवालाचे वर्षी उत्पन्नाची बाजू चांगलीच सुधारून नफ्याची रक्कम १२,०३५ रु. झाली. मूळ अंदाज २,४७२ रुपयांचा होता. कर्जांची रक्कम वाढूनहि थकबाकीचें प्रमाण १,०८० रु. नें उतरून तें ३.९% वर आलें. ५% डिव्हिडंडला ४,६५० रु. लागले. २½% स्वातंत्र्य बोनससाठी २,३२८ रु. ची तरतूद करण्यांत आली. (अध्यक्ष : श्री. रा. ग. आळेकर, बी. एससी; कार्यवाह : श्री. य. श्री. शाळिग्राम.)

### दि सातारा जिल्हा औद्योगिक सहकारी मंडळ लि., कराड

अहवालाचे वर्षी वरील मंडळानें बरीच प्रगति केली आहे. मंडळानें सूत वांटपाचेंच काम मुख्यतः केलें व विणकरास लागणारें साहित्य (धोट्या, तारवया, चमक, वयास लागणारा दोरा, इ.) इत्यादि पुरविण्याचीहि व्यवस्था केली. तयार मालावर तारणकर्ज दिलें व तयार मालाची खरेदी–विक्री केली. १९४६–४७ मध्यें २¾ लक्ष रुपयांची देवघेव झाली होती, ती १९४७–४८ मध्यें १४ लक्ष रुपयांवर आली. नफाहि ३,२९६ रु. वरून ७,६१८ रुपयांवर गेला. स्पेशल डेव्हलपमेंट फंडांत ४,०१७ रुपये गेल्यामुळें शेअरवरील डिव्हिडंड कमी आलें. मंडळ 'अ' वर्गांत आहे. सहकारी संस्थेमार्फत वाटप करण्याचें सरकारचें धोरण असल्यानें मंडळाच्या कार्याची वाढच होईल. (चेअरमनः श्री. ग. ए. तारळेकर, एलएल. बी.; मॅनेजरः श्री. वि. मा. रोकडे.)

### प. खानदेश एक्स-सर्व्हिसमेन्स को. ट्रान्सपोर्ट असोसिएशन लि., धुळें.

असोसिएशन स्वीकारीत असलेल्या मुदती ठेवींचे नवे दर खालील प्रमाणें आहेत:—

| | रक्कम | मुदत | व्याजाचा दर |
|---|---|---|---|
| (अ) सभासदांना | ५० रु. व त्याची पट | १ ते २ वर्षे | ३½% |
| (ब) बिगर-सभासादांना | " | " | ३% |

देणगीसाठी भागीदारांची आगाऊ संमति—म. गांधींच्या स्मरणार्थ निघालेला गांधी राष्ट्रीय स्मारक निधि व तत्सम इतर निधी ह्यांस १५ लक्ष रुपयांपर्यंत देणगी देण्याचा अधिकार डायरेक्टरांना देण्यासाठी, टाटा आ. अँड स्टी. कं. लि.च्या डायरेक्टरांनीं कंपनीची एक विशेष साधारण सभा बोलाविली आहे.

## आंतरराष्ट्रीय व्यापारी संबंध कसे बदलतील?

(भा. म. काळे)

आंतरराष्ट्रीय व्यापार वाढावा व त्यामुळें एकंदर जागतिक उत्पादनाला मदत व्हावी या दृष्टीनें अमेरिकेमार्फत आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटनेमार्फत प्रयत्न चालू आहेत, व हॅवाना परिषदेनें मान्य केलेल्या निर्णयामुळें या बाबतींत पुढें पाऊल पडत आहे. आंतर-राष्ट्रीय व्यापार हा अंतिम पृथक्करण केलें असतां देवघेवीच्या स्वरूपाचा आहे, व त्याचें स्वरूप देशादेशांच्या गरजेवर, राहाणीच्या मानावर, औद्योगिक विकासावर अवलंबून असतें. तेव्हां आंतरराष्ट्रीय व्यापारांत किती वाढ होईल तें प्रत्येक देशाच्या परिस्थितीवर अवलंबून राहातें. हल्लींच्या काळांत आंतरराष्ट्रीय व्यापारांत केवळ दृश्य गोष्टीच (मालाच्या स्वरूपाच्या) येत नाहींत, तर विविध शास्त्रांतील तज्ज्ञांचा सल्ला, भांडवलाची गुंतवणूक, व्यापारी जीवनासाठी बँका, विमा व वाहातुक कंपन्या यांचें कार्य, परराष्ट्रीय प्रवासी इ. गोष्टीहि पर्यायानें आंतरराष्ट्रीय व्यापारावर परिणाम करतात. एका काळीं इटाली व जपान यांची जलवहातूक त्या देशांच्या परराष्ट्रीय व्यापारावर परिणाम करीत होती. इंग्लंड व हिंदुस्थान यांच्या व्यापारी संबंधांत वर उल्लेखिलेले तीनहि व्यवसाय ब्रिटिशांच्या हातीं असल्यामुळें दोनहि देशांमधील परस्पर व्यापारी संबंध वाढवितांना जलवहातूक, विमा, व बँकिंग हे धंदे उपयोगी पडतील असें कांहीं दिवसांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या सरकारी अहवालांवरून दिसून येतें. निरनिराळ्या बांधकामाच्या योजनांसाठी सल्ला, यंत्रसामुग्रीचे कारखाने काढण्यासाठी सल्ला, उत्पादनांत भागीदार म्हणून प्रवेश, इ. प्रकारच्या गोष्टींनीं भावी काळांत हिंद व अमेरिका ह्या देशांच्या व्यापारी संबंधावर महत्त्वाचे परिणाम होणें संभवनीय दिसतें. आज निरनिराळ्या स्वतंत्र देशांमध्यें औद्योगिक पुनर्घटनेच्या योजना हातीं घेतल्या जात आहेत. ह्या योजनांसाठी जितक्या प्रमाणांत परकी भांडवल व तज्ज्ञ इ. चा उपयोग केला जाईल व ह्या योजना ज्या प्रमाणांत यशस्वी होतील त्यांवर भावी काळांत ह्या सर्व देशांचे आंतरराष्ट्रीय व्यापारी संबंध अवलंबून राहतील.

ह्या सर्व परिस्थितीवरून असें दिसून येतें कीं जिनिव्हा, लंडन, हॅवाना इ. परिषदांतून विशिष्ट ध्येय डोळ्यांसमोर ठेवून राष्ट्राराष्ट्रांतील व्यापारवाढीबद्दल चर्चा करून सामान्य नियम ठरविणें एक वेळ सोपें जाईल; परंतु कांहीं वर्षें जागतिक शांतता नांदल्यास व पुष्कळशा देशांचें औद्योगीकरण यशस्वी झाल्यास आंतरराष्ट्रीय व्यापारी संबंधांना आणखी निराळें वळण लागेल. याचा एक परिणाम असा होईल कीं अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया इ. देशांच्या यंत्रसामुग्रीच्या मागणीला प्रतिबंध बसेल. कदाचित् अमेरिकेसारखा देश इतर देशांत माल खपवावयास तयार असेल परंतु आपण मात्र इतरांपासून त्यांच्या मालाची विशेषशी खरेदी करणार नाहीं. असें झाल्यास आंतरराष्ट्रीय व्यापारी संबंध जागतिक दृष्टीनें पुन्हा हेलकावे खातील. सांप्रत अमेरिकेसारखा सर्वच दृष्टींनीं संपन्न देश व्यापार व उद्योगधंदे ह्यांना आवश्यक अशा शास्त्रीय ज्ञानामुळें आंतरराष्ट्रीय व्यापाराचीं सूत्रें आपल्या हातीं ठेवूं शकतो. परंतु एशियाटिक राष्ट्रांच्या औद्योगीकरणामुळें कालांतरानें ही भूमिका अमेरिकेला सोडावी लागेल. सारांश, प्रत्येक देशाच्या आर्थिक व औद्योगिक परिस्थितीवर आंतरराष्ट्रीय व्यापार अवलंबून राहील.


# दि सुप्रीम म्यूच्युअल अॅशुअरन्स कंपनी, लि.

## हैद्राबाद संस्थानांत महत्त्वाचे ठिकाणीं, प्रतिनिधी नेमणें आहेत.

**ठराविक कामाची हमी देऊं शकणाऱ्या वजनदार गृहस्थांनीं भेटावें अथवा लिहावें.**

| | | |
|---|---|---|
| चालू काम | ... | १ कोटीचे वर |
| चालू हप्त्यांचें उत्पन्न | ... | २,३१,१७६ रु. चे वर |
| खर्चाचें प्रमाण | ... | १४·९ टक्के |
| आयुर्विमा निधि | ... | ४ लाखाचे वर |

कंपनीच्या सोलापूर वसाहतीचे बांधकामास लवकरच सुरुवात होणार आहे.

—: काम लवकर संपविणेसाठीं :—

**मुदतीच्या ठेवी घेणें आहेत.**

मुदत व व्याजाचा दर याची माहिती कंपनीचे ऑफिसकडे मिळूं शकेल.

टी. डी. देशपांडे, बी. ए., एलएल. बी. सेक्रेटरी.

हेड ऑफिस : ८६६ सदाशिव पेठ, पुणें २.

व. न. म्हैसूर, एम. ए., एलएल. बी. मॅनेजर.

## महात्मा गांधी स्मारक फंडास दिलेल्या देणगीचें रहस्य

**( कराड अर्बन को. बँक लि. च्या वार्षिक सभेंत श्री. पु. पां. गोखले ह्यांचें अध्यक्षीय भाषण )**

जुलै महिन्यांत हिंदुस्थानच्या अमेरिकेशीं झालेल्या करारान्वयें अमेरिकेंतून रासायनिक द्रव्यें, औषधें,युद्धसाहित्य, इंजिनें, विमानें, धान्यें आणि जरूर तो इतरही कच्चा माल इकडे यावयाचा असून गवताच्या पिशव्या, कांबळीं, चटया, रुजामे, आंबे वगैरे एकूण साठ पदार्थ हिंदुस्थाननें अमेरिकेस पुरवावयाचे आहेत. लुई फिशर आणि विशेषतः अमेरिकन सैनिक यांच्या युद्धकालीन वास्तव्याचा हा फायदा हिंदुस्थानला मिळत असून सदर पदार्थांचा पुरवठा करणें हिंदुस्थानच्या व्यापारवाढीच्या दृष्टीनें जितकें महत्त्वाचें आहे तितकेंच तें सोपें आहे काय? एक तर हिंदुस्थानांतील आजपर्यंतचें सर्व उत्पादन वैयक्तिक अगर खाजगी मर्यादित कंपन्यांच्या जबाबदारीवर होत आलें आहे आणि तेंही येथील स्थानिक मागणीवर लक्ष ठेऊनच. पण आतां जमाना बदलला आहे. आपण आजपर्यंत तयार करीत असलेल्या मालाचें कसब आपलें आहे खरें, पण तेंच आतां पाया-शुद्ध, सुसूत्र, आणि संघटित करून अमेरिकेंत नि इतरत्र हिंदी मालाची प्रतिष्ठा व खप वाढविण्याची जबाबदारीही हिंदी उत्पाद-कावर येऊन पडल्यानें मालाचा दर्जा उंचावला पाहिजे व देश-देशांतील वकलातीनें रुचिरुचींचें संशोधन करून हिंदी उत्पादकास उत्तेजनपूर्वक मार्गदर्शन केलें पाहिजे.

युद्धाचा तिसरा वणवा जगाच्या राशीला येणार नसेल तर व तसा आलाच तर तोपर्यंत सांपडणाऱ्या अवधींतही हिंदुस्थानच्या स्वतंत्र जीवनाची उत्पादक जबाबदारी ही अशी आहे. या आंतर-राष्ट्रीय जबाबदारीइतकीच अंतर्गत जीवनासाठी उत्पादनाची आव-श्यकता आहे. माणशीं १६–१७ औंस धान्याची जरुर असतां १० औंसही नाहीं, तर सहा औंसावर आपणास घास मोजावे लागत आहेत. एक औंस गोड्या तेलाची जरुर असतां तें अर्धा तोळा सरासरीनें मिळतें, आठ औंस दूधदुभत्याची आवश्यकता असतां सरसरीनें तें चार औंसही निष्पन्न होत नाहीं. इमारतीचें लाकूड माणशीं तीस घन फूट मिळणें जरूर असतां, मिळतें अवघें तीन घनफूट. कापडाची गरज माणशीं पस्तीस वार असतां वाटणीला येतें बारा वार !!! आपल्या या अशा जीवनाचा एकंदर विचार केला तर महात्मा गांधी राष्ट्रीय स्मारक निधीला बँकेनें ग्रामोद्योगाच्या उपयोगासाठी ५,००० रु. देणगी देऊं केली त्याचें रहस्य लक्षांत येईल. बाजारभाव आटोक्यांत म्हणजे (१९३९ च्या १००चे मानानें) फार तर १५० वर आणून सोडलेच पाहिजेत. तें साधावयाचें तर चलनवाढ-बंदी, भावनियंत्रण, वगैरे सरकारी संयोजनाप्रमाणें उत्पा-दक उद्योगांची कास लोकांनीं सहकारी तत्त्वावर धरावयास हवी. महात्मा गांधी स्मारक निधीस रेखीवपणें ग्रामोद्योगासाठी आपली देणगी सादर करतांना बँकेपुढें हाच दृष्टीकोन होता. तो लक्षांत घेऊनच निव्वळ नफ्याच्या वीस टक्क्यापेक्षा जे ११४ रु. ७ आणे बँकेस घालावे लागत होते, त्यांची तरतूद बँकेच्या हितचिंतकांनीं केली आहे, हें सांगण्यास मला आनंद तसाच अभिमानही वाटतो.

" उंचावलेली रहाणी म्हणजे सत्तर टक्के तारीख तागायत सोयींची, वीस टक्के सुखाची आणि दहा टक्के सजावटीची राहणी" असा दंडक घालण्यांत येत आहे आणि सहा टक्क्यांच्या वर भागी-दारांना नफा नाहीं असा नियम होण्याच्या रंगांत आहे. अशा रोखांत उत्पादक उद्योगांचे कारखान्यांतील मुदत ठेवीवरही यापुढें घसघशीत व्याजाचे दर मिळतील,अशी अपेक्षा करण्यांत काय अर्थ? शिवाय, "व्याजाचा वार, मुदलाला मार" हा अनुभव सर्वांनीच डोळ्यापुढें ठेवला पाहिजे आणि पुढील पांच वर्षांत मंदीचा काळ येऊं घातला आहे हें जाणून कारखान्यांनीं आपल्या मालमत्तेच्या पंचाहत्तर टक्के बाजार किंमतीपेक्षा जास्ती ठेवी स्वीकारूं नयेत हें पथ्य बँकांच्या नियमावलींनेंच पाळावें, हें हितप्रद होय. कारण ठेवीदाराचे दृष्टीनें कोठलीही सुरक्षित ठेव ती कीं जेथें ठेवीदाराच्या रकमेला भरपूर तारण अप्रत्यक्ष कां होईना मिळूं शकतें. माझ्या या विनम्र निरीक्षणाचा आपण योग्य तो आशय लक्षांत घ्याल अशी आशा करून भागीदारांच्या स्थैर्याचे जीवनास मदत म्हणून सभासद प्रॉव्हिडंड फंडाची योजना बँकेनें मुद्दाम सुरू करण्याचें ठरविलें हें मी आपले निदर्शनास आणूं इच्छितों. दहा, चौदा आणि शेवटीं तीस वर्षांच्या संचित रकमेचा उपयोग होण्याची तरतूद सभासद प्रॉव्हिडंड फंड योजनेंत बँकेनें केली आहे. तिचा आपण सर्वांनीं फायदा घ्यावा अशी मला आर्जवून विनंति करावयाची आहे.

---

### श्री. तांबे व श्री. पोतदार

विक्रीकर कायद्याच्या अंमलबजावणींत मुंबई सरकारला सहाय करण्यासाठी सरकारनें कमिशनर ऑफ सेल्स टॅक्सचे अध्यक्षते-खाली एक समिति नेमली आहे. समितीच्या सभासदांत श्री. बी. व्ही. तांबे व श्री. डी. व्ही. पोतदार हीं नांवें आहेत.

**कापडाच्या ने-आणीवर नियंत्रणें**—ह्यापुढें, कोणासहि स्वतःचें सामान म्हणून १० पौंडांपेक्षा अधिक वजनाचें कापड परवान्या-शिवाय इकडे तिकडे नेतां येणार नाहीं. परवान्यांच्या दृष्टीनें हिन्दुस्थानचे ३४ विभाग करण्यांत आले आहेत.

**सोन्या-चांदीवरील विक्री कर**—एप्रिल, १९४८ पूर्वीं मुंबई प्रांतांत सोन्या-चांदीवर विक्री कर आकारण्यांत येत नसे. पुढें तो दर रुपयास अर्धा आणा ह्याप्रमाणें घेण्यांत येऊं लागला. आतां तो दर १००रुपयांस ४ आणे असा करण्यांत आला आहे. मद्रास-मध्यें हाच दर आहे. चार इतर प्रांतांत सोन्या-चांदीवर विक्री कर नाहीं.

**अमेरिकेंतील मोटारींची मागणी**—अमेरिकेंतील मोटारींच्या उत्पादनाची सध्याची स्थिति लक्षांत घेतली, तर त्या देशांतील मोटा-रींची मागणी भागविण्याला अमेरिकन कारखान्यांना आणखी २६ महिने लागतील. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें, तर मागणी पुरी होण्यास १९५० सालाचा नोव्हेंबर उजाडेल.

**म्हैसूर संस्थानांतील दारूबंदी**—म्हैसूर संस्थानांत १९५० च्या सुमारास संपूर्ण दारूबंदी अंमलांत आणली जाईल. सध्यां चार जिल्ह्यांत दारूबंदी चालू असून पुढील जुलै महिन्यांत ती आणखी तीन जिल्ह्यांत लागू करण्यांत येईल.




हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि घर्वे यांनीं छापिलें व
प्रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.